23 APR 2018

उच्च शिक्षण संचालनालयांगत अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१७/प्रक्र.१७०/मशि-५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- २३ एप्रिल, २०१८

## परिपत्रक

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य या संवर्गाचे पद हे एकाकी पद असून, ते कार्यालय प्रमुखाचे पद आहे. महाविद्यालयातील दैनंदिन प्रशासकीय तसेच शैक्षणिक कामकाजाच्यादृष्टीने तसेच राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती प्रमाणन मिळण्याकरिता नियमित प्राचार्य कार्यरत असणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करून वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०९.६.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार रिक्त असलेली पदे भरण्यास प्राप्त सहमतीनुसार, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील रिक्त असलेली प्राचार्यांची पदे व प्राचार्य पदाचा पाच वर्षाचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर रिक्त होणारी प्राचार्यांची पदे भरण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

२. प्राचार्यांची रिक्त पदे भरताना या संदर्भात अस्तित्वात असलेले अधिनियम, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/ परिपत्रके, आदेश व सूचना त्याचप्रमाणे विहित केलेल्या कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन केले जाईल, याची दक्षता घेण्यात यावी.

३. हे परिपत्रक वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.अनौसंक्र२००/आपुक दिनांक १५.०३.२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्यांचा सांकेतांक क्रमांक २०१८०४२३१११५४०४३०८ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Prakash Bhaskarrao Avhad

Digitally signed by Prakash Bhaskarrao Avhad

(प्रकाश भास्करराव आव्हाड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
३) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे.
५) सर्व कुलसचिव, अकृषिक विद्यापीठे
६) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालये.
७) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा, मुंबई/नागपूर, महाराष्ट्र-१/२.
८) सर्व जिल्हा कोषाधिकारी.
९) लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
१०) वित्त विभाग (आ.पु.क.), मंत्रालय, मुंबई-३२.
११) निवड नस्ती मशि-५.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र. एनजीसी-२०१७/रिक्त पदे/नांवि/मवि-२ /४०४५ दिनांक-२३/४/२०१८

प्रति,

१. कुलसचिव, सर्व अकृषी विदयापीठे
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

**विषय-उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत अशासकीय अनुदानीत वरिष्ठ महाविदयालयातील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

संदर्भ-शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -२०१७/प्रक्र.१७०/मशि-५ दि.२३ एप्रिल २०१८

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत यासोबत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडली आहे. सदर शासनपरिपत्रकात दिलेल्या सुचनांनुसार तात्काळ कार्यवाही सुरु करण्यात यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

Estd:1962
NAAC 'A'Grade

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA**
**PHONE : EPABX - 2609000** **FAX :** ००९१-०२३१-२६९१५३३ & ००९१-०२३१-२६९२३३३
शिवाजी विद्यापीठ,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर-४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.
Website : www.unishivaji.ac.in e-mail : www.affiliationt1@unishivaji.ac.in

शिवाजी वि./संलग्नता टी.१/ प्रशांत/ No 4092 दिनांक 10 MAY 2018

प्राचार्य, संलग्न महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

आपला विश्वासू,

प्र कुलसचिव